| MHKO070026642025 | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल दिनांक | :- | १४/११/२०२५ | | |
| नोंदणी दिनांक | :- | १४/११/२०२५ | | |
| निकाल दिनांक | :- | १३/०५/२०२६ | | |
| कालावधी | :- | वर्ष | महिने | दिवस |
| | | ०० | ०५ | २९ |

=========================================

**जयसिंगपूर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (कोर्ट क्र.०२) यांचे न्यायालयात**

**( पिठासिन अधिकारी – मयूर सं. पाटील यांचेसमोर )**

=========================================

**संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक. १२७५/२०२५**

**निशाणी क्रमांक ६ / ब**

महाराष्ट्र शासन तर्फे पोलिस स्टेशन अधिकारी,
शिरोळ पोलीस स्टेशन, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर .. **अभियोगपक्ष**

***// विरूध्द //***

**श्रीनिवास रामचंद्र कांबळे,**
वय ५२ वर्षे, धंदा– मजुरी,
रा.दलित वस्ती, नृसिंहवाडी,
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर .. **आरोपी**

=========================================

**उपस्थिती –**

श्रीमती एल. एस. सदरेकर – अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी

श्री. आर.बी.कट्टी – आरोपीतर्फे वकिल

=========================================

| | | |
|---|---|---|
| १. | गुन्हा घडलेली तारीख | १९/०९/२०२५ |
| २. | प्रथम खबर | १९/०९/२०२५ |
| ३. | दोषारोप पत्र दाखल तारीख | १४/११/२०२५ |
| ४. | प्रतिकथन तारीख | १६/०३/२०२६ |
| ५. | पुरावा सुरु झालेची तारीख | १०/०४/२०२६ |
| ६. | कोणत्या तारखेला निकालासाठी ठेवले | १३/०५/२०२६ |
| ७. | निकाल तारीख | १३/०५/२०२६ |
| ८. | शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | – |

**<u>आरोपी विषयी माहिती</u>**

| **अ. क्र.** | **आरोपीचे नाव** | **अटक तारीख** | **जामीनावर सुटलेली तारीख** | **केलेले गुन्हे** | **निर्दोष किंवा शिक्षा** |
|---|---|---|---|---|---|
| १. | **श्रीनिवास रामचंद्र कांबळे** | आरोपीस भारतीय नागरीक सुरक्षा संहिता ३५ (३) प्रमाणे नोटीस देणेत आली. | १६/०३/२०२६ | महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५–ई प्रमाणे | निर्दोष मुक्तता. |

**<u>फिर्यादी/बचाव पक्ष/ न्यायालयीन साक्षीदारांची यादी</u>**

**(अ) <u>अभियोग पक्षातर्फे साक्षी यादी</u> :**

| **अ. क्र** | **साक्षीदाराचे नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| अ.सा.१. | विनायक रामराजे पाटील | जप्ती व घटनास्थळ पंच |

**(ब) बचाव पक्षातर्फे साक्षीदार : निरंक.**

**(क) न्यायालया तर्फे साक्षीदार : निरंक.**

**फिर्यादी/बचाव पक्ष/ न्यायालयीन निशाणी क्रमांक**

(अ) **अभियोग पक्षातर्फे निशाणी क्रमांक** :

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| – | ८ | सा.क्र. १ यांची सही. |

(ब) **बचाव पक्षातर्फे निशाणी** : **निरंक.**

(क) **न्यायालयातर्फे निशाणी** : **निरंक.**

(ड) **महत्वपूर्ण वस्तू** : **निरंक.**

==========================================

**न्यायनिर्णय**

**(घोषित दि.१३/०५/२०२६)**

==========================================

आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये दंडनीय अपराधाचा आरोप ठेवून प्रस्तुतचा खटला चालविण्यात आला.

२. अभियोगपक्षाची हकिकत, पुरावा व उभय पक्षांच्या वकिलांच्या युक्तिवादानंतर माझ्या विचाराधीन आलेले मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष विवेचनासह खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, आरोपी ही विनापरवाना, बेकायदेशीररित्या देशी व गावठी हातभट्टीची दारु विक्रीकरीता स्वतःच्या कब्जात बाळगलेली असताना मिळून आली ? | ...नकारार्थी |
| २. | आदेश काय ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमीमांसा

३. सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एल.एस.सदरेकर व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.आर.बी.कट्टी यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

**मुद्दे क्र.१ व २ करीता –**

४. आरोपीविरूध्द ठेवलेला आरोप सिध्द करण्याकामी अभियोग पक्षाने केवळ एक साक्षीदार नामे विनायक रामराजे पाटील (सा.क्र.१) जप्ती पंच याची साक्ष नि.६ सोबत नोंदविली. अभियोगपक्षास पुरेशी संधी देवूनही त्यांनी इतर साक्षीदार हजर न केल्याने मी नि.१ वरील आदेशान्वये अभियोगपक्षाचा पुरावा बंद केला. अभियोगपक्षाच्या पुराव्यात आरोपीविरूध्द दोषार्ह मजकुर न आल्याने आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ३५१ अन्वये निवेदन वगळण्यात आले.

५. साक्षीदार क्र.१ विनायक पाटील यांच्या साक्षीचे अवलोकन केले असता त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये कथन केले आहे की, दि.१९/०९/२०२५ रोजी त्यांना कोणी कोठे बोलाविले होते हे त्यांच्या लक्षात नाही. त्यांच्या समक्ष कोणताही पंचनामा झालेला नव्हता. त्यांना दाखवणेत आलेल्या जप्ती पंचनाम्यावरील अ.क्र.२ वरील त्यांची सही त्यांनी मान्य केली, परंतु त्यातील मजकुर त्यांना माहित नसल्याचे कथन केले. अभियोगपक्षातर्फे सदर साक्षीदारास उत्तर सुचक प्रश्न विचारले असता अभियोगपक्षाच्या लाभात कोणताही कबुली जबाब त्यांच्या मुखातुन आलेला नाही. त्यांनी त्यांच्या समक्ष आरोपीने बाळगलेल्या मालातुन दारू जप्त केल्याचे सांगितले नाही.

५. मुद्देमाल हा आरोपीचे ताब्यातुन जप्त केला याबाबत साक्षीदार सांगत नाही. तसेच अभियोगपक्षाने मुद्देमाल हा आरोपीच्या ताब्यातुन जप्त केल्याचे जप्ती पंचनाम्याव्दारे सिध्द केले नाही. त्यासोबतच अभियोगपक्षाने फिर्याद व जप्ती पंचनाम्यामधील मजकुर सिध्द केला नाही. तसेच अभियोगपक्षाने रासायनिक विश्लेषकाचा अहवाल सिध्द केला नाही. सदरकामी कोणताही प्रत्यक्षदर्शी अथवा स्वंतत्र विश्वासाहार्य साक्षीदार तपासलेला नाही. त्यामुळे अभिकथीत जप्त केलेले द्रव हे मादक द्रव होते व आहे असे शाबीत होत नाही. न्यायाचे तत्व आहे की, अभियोगपक्षाने आरोपीच्या विरुध्दचे आरोप सबळ पुराव्याद्वारे व योग्य संशयाच्या पलिकडे जावुन सिध्द करणे गरजेचे आहे. अभियोगपक्षाच्या पुराव्यामध्ये विसंगती आल्यास त्याचा लाभ

आरोपीला मिळतो. अभियोगपक्षास पुरेशी संधी देवुनही त्यांनी इतर साक्षीदारांना साक्षीकामी हजर ठेवुन तपासले नाही. अभियोगपक्षाने असा कोणताही कागदोपत्री पुरावा हा अभिलेखावर सिध्द केला नाही, जेणेकरुन हे सिध्द होईल कि, आरोपी हा अभिकथित वेळी व ठिकाणी त्याच्या ताब्यात विनापरवाना व बेकायदेशिरपणे अभिकथित मुद्देमाल हा बाळगुन आढळला होता व त्याठिकाणी विक्री करीत होता. त्यामुळे एकंदर अभिलेखावरील उपलब्ध तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता अभियोगपक्षाने आरोपीवर ठेवण्यात आलेला आरोप सक्षम व परिपोषक साक्षीपुराव्यानिशी निसंदिग्धपणे सिध्द केला नाही असे माझे मत आहे. सबब मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नाही असे नोंदवित आहे व मुद्दा क्र. २ च्या उत्तरादाखल खालीप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## – आदेश –

१. आरोपी **श्रीनिवास रामचंद्र कांबळे** यांची महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) खालील शिक्षापात्र गुन्हयातून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २७८(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. अभिकथीत जप्त मुद्देमाल अपील कालावधीनंतर निर्गतीकरीता राज्य उत्पादन शुल्क, विभाग कोल्हापूर यांचेकडे पाठविण्यात याव्यात.

४. जप्त मुद्देमाल म्हणजेच गावठी हातभट्टीची दारु ही जागीच नाश करणेत आली असल्याने त्याबाबत स्वतंत्र आदेश पारीत करणेत आलेला नाही.

५. आरोपीने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८१ प्रमाणे रु.१५,०००/– (रुपये पंधरा हजार मात्र) चे वैयक्तीक बंधपत्र द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

PATIL MAYUR SAMPAT
Digitally signed by PATIL MAYUR SAMPAT
Date: 2026.05.13 16:20:25 +0530

ठिकाण :– जयसिंगपूर.
दिनांक :– १३/०५/२०२६

**(एम.एस.पाटील )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२
जयसिंगपूर.